रविवार, दि. १२ ऑक्टोबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ५३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### पाऊस नैसर्गिक, पण हानी प्रशासनिक!

## जालना शहर महानगर पालिकेने नुकसानीची भरपाई द्यावी

**जालना । प्रतिनिधी -** यंदा जालना जिल्ह्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला असला तरी त्याचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांपेक्षा शहरातील व्यापारी आणि रहिवाशांना बसला आहे. सलग झालेल्या मुसळधार पावसामुळे जालना शहरातील अनेक भागांमध्ये पाणी घरात घुसले, तर अंडरग्राउंड कॉम्प्लेक्समध्ये पाणी तुंबून कोटींचे नुकसान झाले. व्यापारी, छोटे दुकानदार, तसेच रहिवासी यांचे हाल अक्षरशः शब्दातीत होते.

राज्य सरकारने आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांसाठी म दत जाहीर केली असली तरी शहरातील व्यावसायिकांच्या नुकसानीसाठी कोणतीही ठोस तरतूद केलेली नाही. या पार्श्वभूमीवर जालना जिल्हाधिकारी आशिमा मि त्तल यांनी नुकत्याच झालेल्या एका बैठकीत नुकसानग्रस्त व्यापाऱ्यांना पाच ते दहा हजार रुपयांपर्यंत मदत देण्याचे आश्वासन दिले असल्याची खात्रीलायक माहिती 'युवा आदर्श'ला मिळाली आहे. जिल्हाधिकाऱ्यांची ही तत्परता प्रशंसनीय असली तरी काही व्यापाऱ्यांचे नुकसान लाखो-कोटींच्या घरात असल्याने या भरपाईची मर्यादा आणि परिणामकारकता यावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. अतिवृष्टीला अनेक दिवस उलटले तरी नुकसानीचे पंचनामे अद्याप झालेले नाहीत. अनेक व्यापाऱ्यांनी नुकसान झाल्यानंतर पुन्हा नव्याने दुकाने उभी केली आहेत. त्यामुळे आता पंचनामे कसे करणार आणि मदत नेमकी कधी मिळणार, याबाबत प्रशासनाकडे ठोस उत्तर नाही. सलग १० ते १२ दिवस दुकाने बंद राहिल्याने त्यांच्या दैनंदिन उत्पन्नावरही मोठा परिणाम झाला आहे.

शहरात झालेल्या व्यवसायिकांच्या नुकसानीसाठी जालना शहर महानगर पालिका सर्वस्वी जबाबदार आहे. त्यामुळे शासनाने आता ही भरपाई जालना शहर महानगर पालिकेकडून वसुल करुन घ्यावी व आपतीग्रस्तांना द्यावी, अशी मागणी देखील होत आहे.

**मनपा जबाबदार का?**

शहरातील व्यावसायिकांचे नुकसान फक्त पावसाने झाले नाही, तर महानगरपालिकेच्या बेपर्वाईने ते वाढवले, असा आरोप वाढत आहे.

**नगररचनाकारांचा निष्काळजीपणा:** अंडरग्राउंड कॉम्प्लेक्सना परवानगी देताना पावसाच्या पाण्याचा निचरा होईल का, याची तपासणीच करण्यात आली नाही. परिणामी, पावसाळ्यात ही कॉम्प्लेक्स अक्षरशः पाण्याखाली गेली.

**स्वच्छता विभागाचे अपयश:** नाल्यांची स्वच्छता पावसाआधी करणे ही म नपाची जबाबदारी असते. मात्र, प्रत्यक्षात सफाई झालीच नाही, आणि केवळ कागदोपत्री खर्च दाखवण्यात आला. त्यामुळे नाले तुंबले, पाणी शहरात शिरले आणि नागरिकांना अमाप त्रास झाला.

या घटनांमुळे नागरिकांच्या मनात प्रचंड रोष निर्माण झाला आहे. कोणत्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे हे संकट ओढवले?, कॉम्प्लेक्सना परवानगी देताना कोणत्या निकषांकडे दुर्लक्ष झाले?, स्वच्छतेसाठी झालेला खर्च कागदावरच का थांबला? - अशा अनेक प्रश्नांनी प्रशासनाला चिरडून टाकले आहे.



## प्रहार संघटनेच्या वतीने अन्नत्याग आंदोलनाचा इशारा

### परतुर तहसीलदार यांना निवेदन



**परतूर । प्रतिनिधी -** प्रहार संघटनेच्या वतीने दि.१०/१०/२०२५ रोजी तहसीलदार यांना अन्नत्याग उपोषणाचा व आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

दिव्यांगांना १५ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयाप्रमाणे सर्व प्रकारच्या दिव्यांग लाभार्थ्यांना अनुदान १५०० रु. वरून २५०० असा प्रति महिना पेन्शन अनुदान देण्याचे निर्णय झाला.

तसेच ऑक्टोबर महिन्यापासून २५०० रुपये प्रमाणे सर्व प्रकारच्या दिव्यांगांना बँक खात्या मध्ये जमा करण्यात येईल

परंतु ऑक्टोबर महिन्यामध्ये काही दिव्यांगांना २५०० रुपये व ८० टक्के दिव्यांगांना १५०० असे बँक खात्यात वर्ग करण्यात आले यामुळे दिव्यांगांमध्ये साम्रावाचे संतापाचे वातावरण निर्माण झाले असून दिव्यांग आक्रमक **पान २ वर**

## धम्मचक्र प्रवर्तन दिनी महाबुद्ध वंदनेचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** म हामानव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे बौद्ध धम्माची दीक्षा देऊन ६९ वर्षे होत आहेत. धम्म चक्र अनुप्रर्वतन दिन साजरा करण्यासाठी मंगळवार दिनांक १४ऑक्टोबर रोजी जालना शहरात महाबुद्ध वंदनेचे आयोजन करण्यात आले आहे.

जालना शहरातील सर्व समाज बांधवांनी मस्तगड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे या बुद्ध वंदनेसाठी सकाळी ९ वाजता उपस्थित रहावे, असे आवाहन भन्ते धम्मधर शाक्यपुत्र थेरो, भन्ते शिवली शाक्यपुत्र थेरो ,भन्ते रेवत तसेच उपासक ड. ब्रम्हानंद चव्हाण,ड.बी.एम. साळवे, सुधाकरसेठ रत्नपारखे, महेंद्र रत्नपारखे, बबन मगरे ,सुनिल साळवे, सुधाकर रत्नपारखे, ड. शिवाजी आदम ाने,छायाबाई हिवाळे,

भारतीय भारतीय बौद्ध महासभेचे जालना जिल्हाध्यक्ष संजय हेरकर, महासचिव राजेंद्र अंभोरे, उपाध्यक्ष दादाराव लहाने, सत्यशिला राऊत, कोषाध्याक्ष राजकुमार दांडगे, विहार समन्वयक भास्कर घेवंदे, बाळू बोर्डे, राजेंद्र पवार, सुनील जाधव, सुलेखा मनवर,लक्ष्मीबाई काकडे, शशिकला पानपाटील, कांताबाई रत्नपारखे,विशाल सोनवणे, सतीश वाहुळे,संतोष इंगळे, युवराज घोरपडे, आनंद गाडेकर, वंदना इंगळे, लता सोनवणे, नितीन निसर्गन , अनुराधा हेरकर, कविता मगरे आदींनी केले आहे.

## कारवाईसंदर्भात मुख्यमंत्र्यांशी बोलण्याचे माजी आ. गोरंट्याल यांचे आश्वासन

### ज्येष्ठ पत्रकार विजय सकलेचा आणि पीसीएमचे जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांची मध्यस्थी; माजी आमदार गोरंट्याल यांच्या हस्ते पत्रकारांचे उपोषण मागे

**भाजपा किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर शेजुळ यांचा पाठिंबा**

**वंचितचे युवा जिल्हाध्यक्ष विजय लहाने यांचा पाठिंबा**





**उपोषण सोडवितांना माजी आमदार कैलास गोरंट्याल, अक्षय गोरंट्याल यांच्या समवेत ज्येष्ठ पत्रकार विजयकुमार सकलेचा, पीसीएमचे जिल्हाध्यक्ष दीपक शेळके पहिल्या छायाचित्रात तर दुसऱ्या छायाचित्रात डॉ. राजेंद्र गाडेकर, डॉ. विकास गटकळ यांनी उपोषणकर्ते सुनील भारती यांच्या तब्येतीची वेळोवेळी तपासणी केली. उपोषण संपेपर्यंत डॉक्टरांची ही टीम उपोषणस्थळी होती.**

**जालना । प्रतिनिधी -** महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून अपमानास्पद वागणूक मिळाल्यानंतर दोन दिवसांपासून पत्रकार आमिर खान आणि सुनील भारती यांनी जिल्हाधिकारी कार्यालय समोर आमरण उपोषण सुरू केले होते. या आंदोलनाम ागील कारण म्हणजे, पत्रकारांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केली असता संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना संरक्षण मिळाले, परिणामी न्याय आणि कारवाई न होणे. जालना येथील पत्रकार सुनील भारती यांनी सांगितले की, म हावितरणच्या कर्मचाऱ्यांनी आमच्यावर अपमानास्पद वागणूक दाखवली, संबंधित अधिकाऱ्यांविरोधात तक्रार केल्यानंतरही कारवाई झाली नाही. या न्याय न मि ळाल्यामुळे आम्ही आमरण उपोषणास सुरुवात केली.

दहा ऑक्टोबरपासून सुरु असलेल्या या उपोषणाला आज माजी आ. कैलास गोरंट्याल यांनी हस्तक्षेप केला. त्यांनी पत्रकारांना भेटून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कानावर हा विषय मांडण्याचे आश्वासन दिले. या आश्वासनानंतर पत्रकारांनी आपले उपोषण मागे घेतले.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना म ाजी आमदार कैलास गोरंट्याल म्हणाले, पत्रकारांशी सन्मानाने वागण्याची गरज आहे आणि संबंधित अधिकाऱ्यांविरोधात योग्य ती कारवाई होणे आवश्यक आहे.

स्थानिक नागरिकांनी देखील पत्रकारांच्या उपोषणाला समर्थन दिले, यामुळे प्रकरणाला व्यापक लक्ष वेधले गेले आहे. महावितरण प्रशासन आणि अधिकाऱ्यांविरोधात कारवाईसाठी सामाजिक व राजकीय दबाव वाढला आहे, आणि प्रशासनाकडून तत्काळ कारवाई होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

माजी आमदारांच्या हस्तक्षेपामुळे पत्रकारांचे उपोषण मागे गेले, परंतु म हावितरण कर्मचाऱ्यांविरोधात कारवाईसाठी मागणी कायम राहिली आहे. स्थानिक नागरिक व राजकीय नेतृत्व यांनी या प्रकरणाचा पाठिंबा दिल्याने प्रशासनावर दबाव निर्माण झाला आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी राजेंद्र पाटील यांचे देखील आंदोलनादरम्यान सहकार्य मिळाले उपोषणकर्ते सुनील भारती यांची प्रकृती खालावल्यानंतर श्री पाटील यांनी तातडीने डॉ. राजेंद्र गाडेकर, डॉ. विकास गटकळ व ईतर डॉक्टरांना उपोषणस्थळी पाठविले. सुनील भारती यांच्या तब्येतीची या डॉक्टरांनी काळजी घेतली.

**विजय सकलेचा, दीपक शेळके यांची मध्यस्थी...!**

सदर प्रकरणात जेष्ठ पत्रकार विजय सकलेचा आणि प्रेस कॉन्सील ऑफ म हाराष्ट्रचे (पीसीएम) जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी मध्यस्थी करून माजी आमदारांशी संपर्क साधला. पत्रकारांचा उपोषण हा बांधवांच्या हितासाठी असून, त्यांच्या मागण्यांकडे प्रशासन लक्ष देईल असे त्यांनी कैलास गोरंट्याल यांना कळविले. माजी आमदार कैलास गोरंट्याल स्वतः उपोषण स्थळी दाखल झाले आणि पत्रकारांच्या तक्रारी ऐकून तात्काळ कारवाई होईल असे आश्वासन दिले. यानंतर पत्रकारांनी आपले उपोषण मागे घेतले. या घटनाक्रमामुळे जालना जिल्ह्यातील महावितरण प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांकडून पत्रकारांबद्दलच्या गैरवर्तणुकीविषयी नागरिकांमध्ये आणि माध्यमांमध्ये लक्ष केंद्रीत झाले असून, संबंधित अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**ज्ञानेश्वर शेजुळ यांचा पाठिंबा**

महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून जालना येथील पत्रकार सुनील भारती यांना अपम ानास्पद वागणूक दिल्याच्या प्रकरणात कारवाई न झाल्यामुळे, पत्रकारांनी आज अन्नत्याग उपोषण सुरू केले. या उपोषणाला भाजपा किसान सेनेचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली शेजुळ यांनी पाठिंबा दिला आणि महावितरणच्या मस्तवाल अधिकाऱ्यांविरोधात तात्काळ कारवाईची मागणी केली.

श्री शेजुळ म्हणाले, पत्रकारांशी कसे सन्मानाने वागावे, याची अधिकाऱ्यांना जाणीव करून देणे गरजेचे आहे. दोषींविरोधात कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. त्यांच्या या वक्तव्याला स्थानिक समाजात मोठा पाठिंबा मिळाला आहे. या वेळी भाजप ओबीसी मोर्चा, जालना तालुका अध्यक्ष समाधान वाघम ारे यांच्यासह इतर कार्यकर्तेही उपस्थित होते. उपोषण आणि त्यास मिळालेले पाठिंबा यामुळे महावितरण प्रशासनावर दबाव निर्माण झाला असून, संबंधित अधिकाऱ्यांविरोधात कारवाईची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**विजय लहाने यांचा पाठिंबा**

महावितरण कर्मचाऱ्यांकडून अपमानास्पद वागणुकीनंतर सुरू असलेल्या पत्रकारांच्या आमरण उपोषणाला वंचित वंचित बहुजन आघाडीचे युवा जिल्हाध्यक्ष विजय लहाने यांनी पाठिंबा दर्शविला आहे. लहान-मोठ्या माध्यमांशी जोडलेल्या पत्रकारांच्या हक्कांसाठी विजय लहानेंनी सांगितले की, पत्रकारांच्या तक्रारींवर तात्काळ कारवाई होणे आवश्यक आहे, आणि संबंधित अधिकाऱ्यांनी पत्रकारांशी सन्मानाने वागावे, असे त्यांनी ठामपणे म्हटले. त्यांच्या या पाठिंब्यामुळे उपोषण करणाऱ्या पत्रकारांना सामाजिक व राजकीय पाठिंबा मिळाल्याचे वातावरण तयार झाले आहे. तसेच या घटनेमुळे प्रशासनाच्या कारवाईवर जनतेचे लक्ष केंद्रीत झाले असून, योग्य ती कारवाई होण्याची अपेक्षा वाढली आहे.

# मनाच्या गाभाऱ्यातून, मन ही आजारी पडते!

आपल्याला आरोग्याच्या संकल्पनेचा मूळ अर्थ नव्याने समजून घेण्याची आवश्यकता आहे. शारीरिक आरोग्य जितके महत्त्वाचे आहे, तितकेच मानसिक आरोग्यही अनिवार्य आहे. प्रत्यक्षात मानसिक आरोग्य हे आरोग्याचे मूळ केंद्र आहे. शरीर निरोगी असले तरी मन अस्थिर असेल, चिंताग्रस्त असेल, ताणतणावांनी भरलेले असेल तर त्या व्यक्तीचे संपूर्ण आरोग्यच अपूर्ण राहते. जागतिक आरोग्य संघटनेने स्पष्ट केले आहे की, मानसिक आरोग्याशिवाय आरोग्य पूर्ण होऊ शकत नाही. आधुनिक आणि स्पर्धात्मक जगात मानसिक आरोग्य हा विषय केवळ डॉक्टर किंवा रुग्णालयापुरता मर्यादित नाही, तर प्रत्येक घर, प्रत्येक कार्यक्षेत्र आणि प्रत्येक समाजघटकाशी निगडित झाला आहे. भारतात तर ही समस्या झपाट्याने वाढत आहे. 'नॅशनल मेंटल हेल्थ सर्वे' नुसार भारतात सुमारे १०.६ टक्के लोकसंख्या कोणत्यातरी मानसिक विकाराने त्रस्त आहे. म्हणजे प्रत्येक दहा व्यक्तींपैकी किमान एक व्यक्ती सध्या मानसिक आरोग्याच्या समस्येने पीडित आहे.

जीवनातील ताणतणाव, बालपणातील आघात, सामाजिक दबाव आणि आर्थिक अडचणी यामुळे मानसिक आरोग्य ढासळत आहे. आधुनिक भारतात तरुण वर्ग अत्यंत स्पर्धात्मक वातावरणात जगत आहे. शिक्षणात उच्च गुण मिळवण्याचा दबाव, करिअरमध्ये यश मिळवण्याची धडपड, नोकरीची असुरक्षितता, शहरातील महागाई, गृहकर्जाचा ताण, कौटुंबिक जबाबदाऱ्या या सगळ्या गोष्टी एकत्र येऊन मानसिक थकवा आणि असंतोष निर्माण करतात. शिवाय, सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे स्वतःची तुलना इतरांशी करण्याची प्रवृत्ती वाढली आहे, जी आत्मविश्वास कमी करते आणि मानसिक अस्थिरता वाढवते. भारतात अजूनही मानसिक आरोग्याशी संबंधित गैरसमज मोठ्या प्रमाणावर आहेत. एखादी व्यक्ती उदास असेल, नैराश्याने त्रस्त असेल किंवा तणावग्रस्त असेल, तरी ती याबाबत खुल्या मनाने बोलण्यास घाबरते, कारण समाज अजूनही मानसिक आजारांकडे दुर्बलतेच्या किंवा 'वेडेपणाच्या' नजरेने पाहतो. ग्रामीण भागात आणि अल्पसाधन असलेल्या प्रदेशांमध्ये मानसोपचारतज्ज्ञांची संख्या अत्यल्प आहे. एका सर्वेक्षणानुसार, भारतात १ लाख लोकांमागे फक्त ०.७५ मानसोपचारतज्ज्ञ उपलब्ध आहेत. अशा परिस्थितीत सामान्य माणसाला मानसिक आरोग्य सेवा मिळवणे अत्यंत कठीण होते. उपचार न मिळाल्यामुळे समस्या वाढत जातात आणि शेवटी आत्महत्या, व्यसनाधीनता, हिंसाचार किंवा सामाजिक अलिप्तता यांसारखे गंभीर परिणाम दिसतात.

.एखादी व्यक्ती मानसिकदृष्ट्या आजारी असेल तर तिचे विचार, निर्णयक्षमता, नातेसंबंध आणि कामगिरी या सर्वांवर परिणाम होतो. सतत चिंता, उदासीनता किंवा नैराश्य यामुळे एकाग्रता




कमी होते, कामाची उत्पादकता घटते आणि जीवनाबद्दलची प्रेरणा कमी होते. त्याचे पडसाद घरात, कुटुंबात आणि समाजात उमटतात. कुटुंबातील सदस्यांना तणावाच्या झळा बसतात. संवाद कमी होतो आणि घरातील वातावरण विषण्ण बनते. या सर्व समस्यांवर उपाय करायचा असेल तर सर्वप्रथम मानसिक आरोग्याला 'प्राधान्य आरोग्य विषय' म्हणून स्वीकारणे गरजेचे आहे. मानसिक आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी वैयक्तिक, सामाजिक आणि शासकीय पातळीवर समन्वित प्रयत्न करावे लागतील. व्यक्तीच्या दैनंदिन जीवनात काही साध्या पण प्रभावी सवयी रुजवणे हे पहिले पाऊल ठरू शकते. नियमित व्यायाम, योग, ध्यान, पुरेशी झोप आणि संतुलित आहार या गोष्टी मेंदूची कार्यक्षमता आणि मनाच्या स्थैर्यासाठी आवश्यक असतात. सोशल मीडियाचा वापर मर्यादित करणे, नकारात्मक बातम्यांपासून दूर राहणे आणि निसर्गाशी संपर्क ठेवणे या सवयी मनाला शांतता देतात. शाळा, महाविद्यालये आणि कार्यस्थळे ही मानसिक आरोग्य टिकवण्याची महत्त्वाची केंद्रे आहेत. विद्यार्थ्यांना बालपणापासूनच भावनिक शिक्षण दिले पाहिजे, म्हणजेच 'इमोशनल लिटरसी' वाढवली पाहिजे. शाळांमध्ये समुपदेशन केंद्र असावीत, जिथे विद्यार्थी आपल्या चिंता, अपयश किंवा कौटुंबिक अडचणींबद्दल मोकळेपणाने बोलू शकतील. शिक्षक आणि पालकांना मानसिक आरोग्याचे मूलभूत प्रशिक्षण देणे आवश्यक आहे, जेणेकरून ते मुलांच्या बदलत्या वर्तनातून समस्या ओळखू शकतील. कार्यस्थळांवरही मानसिक आरोग्याविषयी संवेदनशील वातावरण तयार करणे गरजेचे आहे. मोठ्या कंपन्यांनी 'एम्प्लॉयी असिस्टन्स प्रोग्राम्स' सुरू केले आहेत, जिथे कर्मचारी आपले भावनिक ताण समुपदेशकांशी बोलून हलके करू शकतात. अशा उपक्रमांनी उत्पादकता वाढते आणि कार्यसंस्कृती आरोग्यदायी राहते. समाज आणि शासन यांची भूमिका याहून अधिक महत्त्वाची आहे. समाजात मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढवणे ही सर्वात पहिली गरज आहे. स्वयंसेवी संस्था, स्थानिक मंडळे आणि माध्यमे यांनी मानसिक आरोग्याविषयी सकारात्मक संदेश प्रसारित केले पाहिजेत. 'मानसिक आजार म्हणजे लाजिरवाणी गोष्ट नाही' हा संदेश सर्वत्र पोहोचायला हवा. शासकीय पातळीवर भारताने २०१७ साली 'मेंटल हेल्थ केअर ॲक्ट' अंमलात आणला, ज्यामध्ये मानसिक आजार असलेल्या व्यक्तींचे अधिकार आणि उपचाराची हमी दिली गेली आहे. राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमदेखील कार्यरत आहे, पण त्याची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्याची गरज आहे. आरोग्य बजेटमधील मानसिक आरोग्यासाठीचा वाटा वाढवणे, प्रत्येक जिल्ह्यात मानसोपचार केंद्र स्थापन करणे आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये समुपदेशन सेवा समाविष्ट करणे या गोष्टी जर काटेकोरपणे राबवल्या गेल्या, तर परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदलू शकते.

# सण उत्सव नामशेष होण्याच्या मार्गावर

एकेकाळी आपल्या देशात भारतीय संस्कृतीत सण उत्सवाला असणारे महत्त्व आता म्हणावे तेवढे राहिले नाही. दिवसेंदिवस सण उत्सवात असणारा मायेचा गोडवा व निखळ आनंद लुप्त होऊन सण-उत्सव नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. आजकालच्या लोकांना सणाचे काहीही देणे घेणे राहिले नाही. आपली पूर्वापार चालत आलेली संस्कृती लोक विसरून गेले आहेत. जोपर्यंत जुनी पिढी अस्तित्वात होती, तोपर्यंत सण देखील अस्तित्वात होते. परंतु जसजसे जुने व जेष्ठ नागरिक कमी होत आहेत, तसतसे सण उत्सवाचे महत्व कमी होत आहे. आजकालच्या पिढीला सणांच्या तारखा जर माहित करून घ्यायच्या असतील तर कॅलेंडर पहावे लागत आहे. तेव्हा कुठे सणाच्या तारखा माहित होत आहेत. परंतु जुन्या पिढीला कॅलेंडर कळत नव्हते ना जुनी पिढी तेवढी सुशिक्षित नव्हती, अडाणी असून देखील ते सणाचे दिवस कॅलेंडर शिवाय अचूक ओळखायची. निसर्गाचे वातावरण बघून कोणता सण कोणत्या तारखेला आहे हे अचूक हेरण्याचे तंत्र जुन्या पिढीच्या दिमाखात होते. कारण त्याकाळी सणांना विशेष महत्त्व होते. सण दहा दिवसांवर आलाय म्हटल्यावर गावातील लहान, थोर, बालक आनंदाने थुई थुई नाचायचे. दहा दिवस आधी त्या सणाचे पडसाद गल्लीत, समाजात व गावात उमटायचे. दिवाळी व रंगपंचमी जवळ आली म्हटल्यावर गावातील लहान, थोर, मंडळी यांना उत्सुकता लागायची ती बुंदीचे गोळे खायची, मनसोक्त फटाके फोडायची आणि भरपेट फराळ खायची. लहान थोर मंडळी दिवाळी दहा-बारा दिवसांवर येऊन ठेपली म्हटल्यावर फटाके फोडायला सुरुवात करायची. आणि फटाके फोडूनच दिवाळीची सुरुवात व स्वागत करायची. तेव्हा दिवाळी सणाला फार महत्त्व होते. दिवाळी जवळ येऊ लागली की, नवविवाहित महिलांना वेध लागायचे ते आपल्या माहेरी जाण्याचे. लहान मुलांना वेध लागायचे ते फटाके फोडण्याचे. पूर्वी दिवाळीला फराळ देखील मोठ्या प्रमाणात बनवले जायचे. काहीजण दिवाळीला आपल्या मामाच्या गावी जाऊन दिवाळी साजरी करायचे. त्यात महिलांचा व लहान बालकांचा समावेश असायचा. त्याकाळी प्रत्येक जण दिवाळीला नटून थटून व नवे कोरे कपडे घालून फटाके फोडत गावात मिरवायचा. दिवाळी सणाला पुणे मुंबई या ठिकाणी कामानिमित्त गेलेले सगळे दिवाळीच्या निमित्ताने आपल्या गावी यायचे. त्यामुळे दिवाळी सणाला प्रचंड महत्त्व दिले जायचे. परंतु खेदाची बाब अशी की, आजकाल कोणत्याच सणाला म्हणावे तेवढे महत्त्व राहिले नाही. सण उत्सव लोप पावण्याच्या मार्गावर आहेत. रंगपंचमीला असणारा रंग आता राहिला नाही. दोन दिवसा अगोदर खेळली जाणारी रंगपंचमी आता समूळ नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. पोळा सणाचे महत्व आपण आपल्या गावात बघतच आहोत. आजकाल शेतकऱ्यांकडे बैल जोडी राहिली नाही. शेतीचे सर्व कामे ट्रॅक्टरच्या साह्याने केली जात आहेत. त्यामुळे शेतकरी आता बैल सांभाळत नाहीत. म्हणून पोळा सणाचे महत्त्व दिवसेंदिवस कमी होत आहे. रक्षाबंधन या सणाला पूर्वी फार महत्त्व होते. भाऊ कितीही लांब असला, कितीही दूर देशी असला तरी आपल्या बहिणीचा राखीचा मान घ्यायला तो गावाकडे यायचा. सर्व मुली आपल्या भावाला राखी बांधण्यासाठी माहेरी यायच्या. परंतु मी बघतोय की, आजकाल रक्षाबंधनाला ना भाऊ गावाकडे येतो ना त्याची बहीण गावाकडे येते. म्हणजे रक्षाबंधन हा सण सुद्धा एक दिवस कायमचा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. मित्रांनो मला तर असे वाटते की, आपल्या सगळ्यांच्या जीवनात एक दिवस असा येईल की, सगळे सण उत्सव नामशेष होऊन केवळ नावालाच शिल्लक राहतील. पुढच्या पिढीला सणाचे महत्त्व पुस्तकात वाचावे लागेल. हल्ली जोपर्यंत ज्येष्ठ नागरिक जिवंत आहेत तोपर्यंत कसेतरी सण उत्सव साजरे होतील. परंतु त्यांच्या पश्चात सणाचे दिवस सुद्धा मावळतील. प्रत्येकाने विचार करून बघावा की, एक दहा वर्षांपूर्वी दिवाळीचे स्वरूप कसे होते आणि आता कसे आहे? आपल्या बालपणीची रंगपंचमी व पोळा कसा होता? आणि या सणाला आता आलेले दिवस कसे आहेत? हे प्रत्येकाने आत्मपरीक्षण करून बघायला हवे. कोणाला असाही प्रश्न पडेल की, पूर्वी प्रत्येक सणाला विशेष महत्त्व होते परंतु आता का नाही? तर याचा मुद्दा असा की, पूर्वीच्या लोकांची परिस्थिती फार गंभीर व बिकट होती. लोकांना मिरचू भाकर खाऊन दिवस काढावे लागायचे. पोळ्या, जामून, करंज्या आणि बुंदीचे लाडू हे केवळ सणाच्याच दिवशीच खायला मिळायचे. तेव्हाची लोक काहीही करून दिवाळी व इतर प्रत्येक सण गोड साजरा करायचे. पैसा नसला तरी रीन काढून सण साजरा करणे हे त्याकाळी लोकांचे धोरण असायचे. लहान मुलांना व घरातील सदस्यांना वाटायचे की, सणाच्या निमित्ताने तरी आपल्याला गोडधोड खायला मिळेल. म्हणून त्याकाळी लोकांना सणाची आतुरता लागलेली असायची. कारण त्याकाळी लोक भारतीय संस्कृतीला विशेष असे महत्त्व द्यायचे. आता प्रत्येकाकडे पैसा व संपत्ती आली, लोकांचे दिवस बदलले, लोक मनात आले तेव्हा गोडधोड करून खाऊ लागले. आठवड्यातून एकदा तरी लोकांच्या घरी पोळ्या केल्या जातात. बुंदीचे लाडू, जामुन, करंज्या व अनारसे असे वेगवेगळ्या प्रकारचे पदार्थ लोक मनात आले तेव्हा बनवून खात आहेत. परंतु तेव्हा सणाच्या दिवशीच हे बनवून खाल्ले जायचे. म्हणून तेव्हाच्या लोकांना सणांची आतुरता लागलेली असायची. सण आला म्हणजे पुरणपोळी आली, गोडधोड आले, बुंदीचे लाडू आले तसेच भज्जी, चिवडा व पापड असे कितीतरी चमचमीत पदार्थ खायला तेव्हाची माणसे आतुर असायची. म्हणून माणसाला सण महत्त्वाचा वाटायचा. तसेच सणाच्या निमित्ताने विवाहित मुलींना आपल्या गावाकडे आणण्याची प्रथा होती. ही प्रथा देखील काही दिवसांनी बंद पडेल असे मला वाटत आहे. शहरी भागात कामाला गेलेली माणसे सणाच्या निमित्ताने गावी यायचे.. केव्हा मित्रांच्या गाठीभेटी व्हायच्या, एकमेकांची ख्यालीखुशाली विचारली जायची. जिवलग मित्र एकमेकांपुढे आपले मन मोकळे करायचे. परंतु आता मोबाईलच्या जमान्यात सण उत्सव हे मोबाईलवरच साजरे केले जात आहे. मोबाईलवर स्टेटस ठेवणे आणि शुभेच्छा देणे एवढ्या पुरतेच सण उत्सव मर्यादित राहिले आहेत. आता जरी चांगले चुंगले खायला मिळत असले तरी, भारतीय संस्कृती अस्तित्वात ठेवायची असेल तर आपल्याला सर्वांनी एकत्र येऊन सण उत्सव साजरे केलेच पाहिजेच... तरच पुढील पिढीला सणाचे महत्त्व कळणार आहे... आपल्याला लोप पावत असलेली भारतीय संस्कृती जर वाचवायची असेल तर घरोघरी लहान मुलांमध्ये सणाचे महत्त्व रुजवून सण-उत्सव साजरे केले पाहिजेत नाहीतर आणखीन पाच दहा वर्षात सण उत्सव नामशेष होऊन केवळ मोबाईलवरच साजरे केले जातील, असे मला वाटते...

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे, खंडाळी**
**ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## वाचकांचे मनोगत

# बुटा मागे दडलयं काय?

भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर भर न्यायालयात एका वकिलाने बुट फेकला.जोडा फेकून मारणे जुनीच परंपरा आहे.देशाचे सर्वोच्च न्यायालय संविधानाचे रक्षक आहे.बुटाच्या कृतीने कायद्याचे राज्य संकल्पनाच मोडीत काढण्याचा मनसुबा दिसून येतो.सोमवारी घडलेल्या कृत्याने सरन्यायाधीश विचलित झाले नाहीत. अशा घटनांबद्दल विचार न करता त्यांनी आपले न्यायालयीन कामकाज सुरू ठेवले.बुट फेकणार्या वकिलाने धार्मिक रंग दिला याचाच अर्थ सरन्यायाधीश भूषण गवई यांनी आपल्या सदसद्विवेक बुद्धीला स्मरुण मागील अकरा वर्षांत केंद्र सरकारने देशातील तपास यंत्रणेचा केलेला गैरवापर, निर्वाचन आयोगाकडून घेतलेल्या चुकीच्या निर्णयावर भाष्य केले होते हे तर बुटाच्या मागे कारण नाही ना ? भूषण गवई महाराष्ट्राचे सुपुत्र आहेत त्यांनी मागील तीन वर्षांपासून महाराष्ट्रातील राजकारणातील हेराफेरी पाहिली आहे.पदभार स्वीकारल्यानंतर प्रथमच ते महाराष्ट्रात आले तेव्हा महाराष्ट्र सरकारने त्यांच्या स्वागताचा शिष्टाचार पाळला नाही.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत २५ नोव्हेंबर १९४९ रोजी केलेल्या अखेरच्या भाषणात देशातील सामाजिक विषमतेवर चिंता व्यक्त केली होती.आज,स्वातंत्र्याला ७५ वर्षे झाल्यानंतरही चिंता मिटलेली नाही हे बुट फेकीच्या प्रकारातून दिसले.

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

पान १ वरुन

## प्रहार संघटनेच्यावतीने ...

झालेले आहेत तरी तहसीलदार यांनी विशेष लक्ष घालून तालुक्यातील सर्व प्रकारच्या दिव्यांगांना २५०० रुपये प्रति महिना देण्यात यावा या करता प्रहार संघटनेच्या वतीने येणाऱ्या काही दिवसांमध्ये अन्नत्याग आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. यामध्ये प्रहार संघटनेचे, अशोक तनपुरे. हनुमान माने. शेरखान पठाण. बजरंग वैष्णव.यांची उपस्थिती होती. यावेळी निवेदन स्वीकारताना नायब तहसीलदार काळे, चौरे, संजय निराधार कर्मचारी तसेच दिव्यांग बांधव व भगिनी संजय आढे, अंजना भालेकर, प्रमोद नवगिरे, उमेश वैष्णव. उषा पडघने, पुंडलिक राठोड, विनोद आडे, विकास आडे, शेख कटू, संपत उबाळे. प्रभाकर पाटोळे, पूजा गोरबन, यशोदा लबासे, शबाना शेख, सय्यद जाफर, ज्ञानेश्वर आडे, बालासाहेब खरात, आसाराम राठोड, केशव मोरे, सुभाष शिंदे. आदी तालुक्यातील दिव्यांग बांधव भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# कृषि समृद्धी योजना

(शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी शासनाची महत्वाकांक्षी योजना)
कृषि समृध्दी योजना अंतर्गत

## यंत्र/अवजारे अनुदान मर्यादा

| यंत्र व अवजाराचा प्रकार | अनुदान मर्यादा: इतर भूधारक शेतकऱ्यांसाठी ४०% — मंजूर कमाल अनुदान मर्यादा प्रतियंत्र | अनुदान मर्यादा: अनुसूचित जाती / जमाती / महिला / अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांसाठी ५० % — मंजूर कमाल अनुदान मर्यादा प्रतियंत्र |
|---|---|---|
| ट्रॅक्टर | १ लाख | १.२५ लाख |
| रोटाव्हेटर | ४८ ते ७६ हजार | ६० ते ९५ हजार |
| पॉवर टिलर | ७० हजार | ८५ हजार |
| पॉवर विडर | २४ ते ६८ हजार | ३० ते ८५ हजार |
| स्वयंचलित भात लावणी यंत्र | १ लाख ३६ हजार | १ लाख ७० हजार |
| भात लावणी (मनुष्य चलित) | ८ हजार | १० हजार |
| भात कापणी यंत्र | २४ ते ६० हजार | ३० ते ७५ हजार |
| भात मळणी यंत्र | ३० ते १.१२ हजार | ३८ ते १.४० हजार |
| भात मळणी यंत्र (मनुष्य चलित) | ८ हजार | १० हजार |
| ब्रश कटर | १६ ते ३५ हजार | २० ते ४४ हजार |
| प्लॅस्टिक मल्चिंग मशिन | १८ ते ४० हजार | २३ ते ५० हजार |
| सुपारी काढणी यंत्र | २४ हजार | ३० हजार |
| फलोत्पादन यंत्र कापणी/छाटणी इ. | २८ हजार | ३५ हजार |
| चेन सॉ | ३६ हजार | ४५ हजार |
| मिनी राईस मिल | १ लाख ते १ लाख ९२ हजार | १ लाख ५० ते २ लाख ४० |
| पॉवर स्प्रेअर १६ लि. चे आत | २४०० ते ३२०० | ३००० ते ४००० |
| पॉवर स्प्रेअर १६ लि. चे वर | ८ हजार | १० हजार |
| कृषि औजारे बँक स्थापना (CHC)- | प्रकल्प खर्च (रु.१० लाख ते रु. २५० लाख) च्या ४०% किंवा रु. ४ लाख ते रु. १ कोटी या पेक्षा जे कमी असेल ते | |

## सिंचन सुविधा या बाबीमधून

| तपशिल | अनुदान मर्यादा | | |
|---|---|---|---|
| | लहान व सिमांत शेतकरी | इतर शेतकरी | अनुसुचित जाती व जमाती |
| ठिबक व तुषार सिंचन (२० गुंठे ते ५ हे. पर्यंत लाभ घेता येईल) पुरक अनुदान (मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना ) | ५५% +२५% | ४५% +३0% | ९0% |

### सिंचन सुविधा या बाबीमधून

इलेक्ट्रीक मोटर पंप, डिझेल/पेट्रोल इंजिन, शेततळे, पाईप संच पुरवठा, ठिबक सिंचन व तुषार सिंचन करिता अनुदान

### फलोत्पादन या बाबीमधून

हरितगृह, शेडनेट, मल्चींग पेपर, वीडमॅट, पॅक हाऊस, फळ प्रक्रिया केंद्र, आंबा पुनरुज्जीवन, रोपवाटिका उभारणी व औषधी, मसाला, फुलशेती क्षेत्रविस्तार या कता शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येणार

### यांत्रिकीकरण या बाबीमधून

ट्रॅक्टर, पॉवर टिलर, पॉवर विडर, ब्रश कटर, फवारणी पंप, भात कापणी यंत्र, कडबा कुट्टी, श्रेडर, वुड चीपर, सुपारी काढणी यंत्र इत्यादी यंत्र अवजारांना ४0 % व ५0 % अनुदान

**प्रथम अर्ज प्रथम प्राधान्य या तत्वानुसार निवड होणार असून त्याकरिता**

https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/AgriLogin/AgriLogin

महाडीबीटी पोर्टलवर सीएससी सेंटरव्दारे अर्ज करावेत असे आवाहन कृषि विभागामार्फत करण्यात येत आहे.

अर्ज करण्याकरिता ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी असणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी तालुका कृषि अधिकारी व गावातील सहाय्यक कृषि अधिकारी यांचेशी संपर्क



## फलोत्पादन अनुदान मर्यादा

| लागवड साहित्याची निर्मिती (संख्या) | अनुदान मर्यादा |
|---|---|
| अ) उच्च तंत्रज्ञान आधारित लहान रोपवाटीका स्थापन करणे -0.४0 ते १ हे. | सार्वजनिक क्षेत्र-१00%,खाजगी क्षेत्र-५0% रु. १0.00 लाख / हेक्टर |
| ब) उच्च तंत्रज्ञान आधारित मोठी रोपवाटीका स्थापन करणे - १ ते २ हे. | सार्वजनिक क्षेत्र-१00%,खाजगी क्षेत्र-४0% रु. १२.00 लाख / हेक्टर |
| **जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन (हे.)** | |
| आंबा | रु.0.२४ लाख/हेक्टर ४0% |
| **सामुहिक शेततळे (संख्या)** | |
| ३४मी.x३४मी.x४.७मी.(५000घ.मी.) | रु. ३.00 लाख (सर्वसाधारण क्षेत्र) ७५% |
| शेततळे अस्तरीकरण | खर्चाच्या ५0%,जास्तीत जास्त रु.0.७५ लाख |
| **नियंत्रित शेती (हे./संख्या)** | |
| हरितगृह (हे.) | रु.३.00 लाख ते रु.१२.५0 लाख (५0%) क्षेत्र-५ ते २५ गुंठे पर्यंत) |
| शेडनेट हाऊस (हे.) | रु.१.७७ लाख ते रु.८.८७ लाख (५0%) क्षेत्र-५ गुंठे ते २५ गुंठे पर्यंत) |
| प्लॅस्टिक मल्चिंग (हे.) | खर्च मापदंडाच्या ५0 % किंवा जास्तीत जास्त रु.0.२0 लाख |
| **मधुमक्षिका पालन (संख्या)** | |
| मधुमक्षिका वसाहत संच वाटप | रु.१६00/- युनिट (५0 संच/लाभार्थी) ४0% |
| मधुमक्षिका पेटी | रु.८00/-पेटी (५0 पेटी/लाभार्थी) ४0% |
| मध काढणी यंत्र | रु.८000/-सेट (१ सेट/लाभार्थी) ४0% |
| **काढणीोत्तर व्यवस्थापन (संख्या)** | |
| १) फार्म गेट पॅक हाऊस | ५0% किंवा रु. १२.५0 लाख (अधिकतम) |
| २) एकात्मिक पॅक हाऊस | ३५ % किंवा रु. ५६ लाख (अधिकतम) |
| ३) पूर्व शितकरण गृह | ३५ % किंवा रु. १0.५0 लाख (अधिकतम) |
| ४) शितखोली | ३५ % किंवा रु. १८.२0 लाख (अधिकतम) |
| ५) शितगृह | ३५ % किंवा रु. १७.५0 लाख (अधिकतम) |
| ६) शितवाहन | ३५ % किंवा रु. १0.८५ लाख (अधिकतम) |
| ७) रायपनिंग चेंबर | ३५ % किंवा रु. 0.४२ लाख (अधिकतम) |
| ८) प्राथमिक प्रक्रिया केंद्र | ३५ % किंवा रु. १२.२५ लाख (अधिकतम) |

- स्व. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना-१0 गुंठे ते १0 हे. पर्यंत लाभ घेता येईल.
- मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना - अनुदान ३0% किंवा अधिकतम रु ५0 लाख

**'शेतकऱ्यांचा डिजिटल मित्र'**

महाडीबीटी पोर्टलवर अर्ज | कृषि विभागाचे महाविस्तार AI ॲप


# दीपसान रेमेडी




- वृत्तपत्रे (दैनिक, साप्ताहिक) पेज सेटींग
- वेब पोर्टल, युट्युब चॅनल
- वृत्तपत्रांचे वार्षिक विवरण
- नविन शिर्षक (वृत्तपत्र) नोंदणी ऑनलाईन अर्ज
- वृत्तपत्रांशी निगडीत सर्व प्रश्नांचे अल्पदरात उपाय

**वृत्तपत्र, वेब पोर्टल नोंदणी संदर्भात संपूर्ण मार्गदर्शन**
**अधिस्विकृती पत्रिकेसंदर्भात संपूर्ण मार्गदर्शन**
**वृत्तपत्र शासनमान्य यादीत समाविष्ट करण्यासाठी मार्गदर्शन**

9975387225 | 8390098886




# टेंभुर्णी येथील शाळेच्या विद्यार्थीसाठी बसेस सुरू करा ग्रामसंसदच्या वतीने मागणी

**विशाल देशमुख जाफ्राबाद -** टेंभुर्णी येथील श्रीमती जे.बी. के. विद्यालय विद्यालय वर्ग ५ वी ते १२ वी पर्यंत जवळपास ५० ते ६० विद्यार्थ्यांनी शाळेत येणे जाणे पाय पिटा करावा लागत आहे गणेशपुर येथील काही शाळकरी मुलींनी आगारा प्रमुख यांच्या कडे तक्रार केली आहे की जाफ्राबाद आगाराच्या साध्या बसेस टेंभुर्णी छत्रपती शिवाजी चौकात गणेशपुर फाटा येथे थांबलेल्या असतांना वाहक व चालक बस मध्ये घेत नाही त्यामुळे विद्यार्थिनींच्या उपस्थितीवर परिणाम होत आहे. टेंभुर्णी येथुन आगाराच्या बसेस छत्रपती शिवाजी चौक ते गणेशपुर फाटा येथे थांबविण्यात यावे अशी मागणी सरपंच गौतम म्हस्के सुनिल भाले गजानन अंधारे गणेश गाडेकर व गावकऱ्यांसह म ागणी होत आहे.



## ७८ व्या वार्षिक निरंकारी संत समागमाची व्यापक पूर्वतयारी

# मुंबईसह महाराष्ट्रातील हजारो स्वयंसेवक समर्पित करत आहेत त्यांच्या निष्काम सेवा

**जालना । प्रतिनिधी -** संत निरंकारी मिशनचा ७८ वा वार्षिक संत समागम, गतवर्षांच्या दिव्यता आणि गौरवशाली परंपरेशी सुसंगत राहून, या वर्षीही ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर, २०२५ दरम्यान संत निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा (हरियाणा) येथे अत्यंत भव्यरूपात, श्रद्धापूर्ण आणि आध्यात्मिक उत्साहात साजरा होणार आहे.

हा दिव्य सोहळा सतगुरु म ाता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पवित्र सान्निध्यात संपन्न होणार असून, या आनंदवार्तेने सर्व श्रद्धाळू भक्तांच्या अंत:करणात अगणित हर्ष आणि आध्यात्मिक ऊर्जा संचारली आहे.या वर्षीचा वार्षिक समागम आत्ममंथन या विषयावर आधारित आहे.

हा समागम म्हणजे भक्तांसाठी एक अद्वितीय अध्यात्मिक प्रवास आहे, जिथे ते ब्रह्मज्ञानाच्या आत्मिक प्रकाशात सेवा, नामस्मरण आणि सत्संगाच्या माध्यमातून आनंद व प्रेमाभक्तीचा अनुभव घेतील.या दिव्य उत्सवाची तयारी अत्यंत श्रद्धा, निष्ठा आणि निस्वार्थ भावनेने केली जात आहे. श्रद्धाळू भक्तगण वयस्कर असो वा युवा, पुरुष असो किंवा स्त्रिया सर्वजण म नोभावे सेवेत मग्न आहेत. सम ागमस्थळी पहाटेच्या पहिल्या किरणापासून ते सायंकाळच्या संध्या प्रकाशापर्यंत प्रत्येक ठिकाणी भक्तिभावाने समर्पित सेवेचे अलौकिक दृश्य दिसून येत आहे. इथे कोणी माती उचलत आहे, कोणी निवासी तंबू बांधत आहे, कोणी स्वच्छता करत आहे तर कोणी पाणीपुरवठा व भोजन व्यवस्थेची सेवा पाहतो आहे.

मुंबई व महाराष्ट्रातून हजारो स्वयंसेवक समागम ाच्या पूर्वतयारीसाठी आपल्या निष्काम सेवा समर्पित करत आहेत.७८ व्या वार्षिक संत समागमाची भव्यता दर्शवणारे मुख्य प्रवेशद्वारही आता आकार घेऊ लागले आहे, जे प्रेम, समरसता आणि आत्मि क एकत्वाच्या यात्रेचे प्रतीक ठरणार आहे. हे सर्व त्या समर्पण भावनेचे प्रमाण आहे, जी सतगुरुंच्या ज्ञानातून उत्पन्न होते. जसे म्हटले गेले आहे, की जिथे सेवेत समर्पण असते, तिथे प्रत्येक क्षण उत्सव बनतो. सेवाभावाच्या या अद्वितीय



दृश्यात स्पष्टपणे जाणवते, की या सेवादारांच्या चेहर्यावर थकवा नव्हे, तर आनंद आणि उत्साहाचे तेज झळकत आहे. हा तोच दिव्य आनंद आहे, जो फक्त सतगुरुंच्या छत्रछायेत राहून सेवा आणि भक्तीच्या माध्यमातून अनुभवता येतो. सतगुरु माताजी सुद्धा नेहमी आपल्या प्रवचनांमधून प्रेरणा देतात, की तन पवित्र सेवा केली, धन पवित्र दिले दान, मन पवित्र हरिभजनाने, त्रिविध होई कल्याण.समागमात केवळ देशाच्या कानाकोपर्यातूनच नव्हे, तर विदेशांतूनही लाखो श्रद्धाळू भक्तगण सहभागी होण्यासाठी येतात. त्यांच्या स्वागत आणि सुविधांसाठी सर्व आवश्यक व्यवस्था अत्यंत काटेकोर आणि नियोजनबद्ध पद्धतीने केली जात आहे.

रेल्वे स्थानके, बसस्थानके आणि विमानतळांवर निरंकारी सेवादलाचे अनुशासित व सुसज्जित सेवक आपल्या निळ्या व खाकी गणवेशात, श्रद्धाळूंचे आदरपूर्वक स्वागत करून त्यांना समागमस्थळी पोहोचवण्यासाठी सतत तत्पर राहतील. निःसंशयपणे, हा समागम केवळ एक साधारण धार्मिक कार्यक्रम नसून म ानवतेच्या उत्थानाचा आणि समरसतेच्या जागृतीचा एक अनुपम उत्सव आहे जिथे विविध संस्कृती, भाषा आणि प्रांतातून आलेले श्रद्धाळू भक्तगण वसुधैव कुटुंबकम या भावनेला आत्मसात करून, सतगुरुंच्या अमृतवाणीमधून आपले अंतःकरण प्रकाशमय करतील. या पवित्र प्रसंगी अशा सर्व सज्जन, बंधु-भगिनी यांचे मन:पूर्वक स्वागत आहे, जे प्रेम, शांती आणि समरसतेच्या या दिव्य महायज्ञाचा भाग बनू इच्छितात.

युवा आदर्श

## वार्धक्य ...

बोलत रहावे सतत
तेचं तेचं तसे वाक्य
खोट्याचे होई सत्य
प्रयोग सफल शक्य
मानहानी करा नीत
सहज हरे अजिंक्य
सोपे सुलभ होईलं
असूद्या गोष्टअतर्क्य
दणकट पूल कोसळे
घडवू आण अनैक्य
मोडीत काढे शत्रुला
स्व पक्षात हवे ऐक्य
कामकरे मतभिन्नता
असूनही मताधिक्य
फूटपडे भावाभवात
बुध्दीत वसे चाणाक्य
दुभंगली नाती जुळती
काही नसते अशक्य
चक्रव्यूह असे जमवे
घडू शकते अप्रतर्क्य
स्वकर्तृत्वाबद्दल मात्र
नक्की हवे आस्तिक्य
सत्ता इच्छा हो तरूण
येवू दे भलेही वार्धक्य
सोयरिक करेन म्हणा
जमूनआणावे गणैक्य
निर्णय ना सांगे घाईत
ताणून ठेवा औत्सुक्य

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# आयर्न कुठुंबरे ३ किलोमिटर धावणे स्पर्धेत तालुक्यातून प्रथम

**विशाल देशमुख**
भोकरदन - येथे झालेल्या तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत जिल्हा परिषद हायस्कूल अन्वा चे विद्यार्थी आर्यन कुठुंबरे बरे ३ किलोमीटर धावणे च्या स्पर्धेत तालुक्यातून प्रथम अजय सिंगल २०० मीटरच्या धावण्याच्या स्पर्धेत तालुक्यातून प्रथम लांब उडी मध्ये निवृत्ती जाधव तालुक्यातून तिसरा अनुक्रमे प्रथम व तृतीय क्रमांक मिळून जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेसाठी पात्र झाला आहे त्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री बेडवाल सर गवळी सर पाबळे सर शेळके सर सोनवणे सर रींडे सर सपकाळे मॅडम इंगळे मॅडम कुटुंबरे मॅडम सपकाळ सर उजळंबे सर खुळे मॅडम. पल्हाळ मॅडम यांनी क्रीडा शिक्षक फदाट सर व मार्गदर्शक फोलाने सर यांचे अभिनंदन केले.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमी उत्सवासाठी सह-सरकार्यवाह रामदत्त चक्रधर जालन्यात

## जिल्ह्यातील स्वयंसेवकांमध्ये उत्साहाचे वातावरण

**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला यावर्षी १०० वर्षे पूर्ण होत असल्याने संपूर्ण देशभरात संघ शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. या विशेष वर्षानिमित्त संघ स्वयंसेवक विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रनिर्माणाशी संबंधित उपक्रमांचे आयोजन वर्षभर करणार आहेत. या पार्श्वभूमीवर विजयादशमी उत्सव - जो संघाचे प्रमुख आणि पारंपरिक सहा उत्सवांपैकी एक आहे - जालना शहरात यंदा भव्य उत्साहात साजरा होणार आहे.

हा उत्सव रविवार, दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ रोजी हॉटेल अमित गार्डन, देऊळगाव राजा रोड, जालना येथे सायंकाळी ५:४५ वाजता सुरू होणार आहे. या कार्यक्रमाला महिको कंपनीचे अध्यक्ष श्री राजेंद्र बद्रीनारायणजी बारवाले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत, तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सह-सरकार्यवाह श्री रामदत्तजी चक्रधर हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत.

विजयादशमी हा दिवस संघाच्या इतिहासात विशेष मानला जातो. १९२५ साली याच दिवशी नागपूर येथे डॉ. केशवराव बळीराम हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली होती. त्यामुळे हा दिवस संघाच्या संघटनात्मक पुनर्जन्माचा दिवस मानला जातो.

दरवर्षी या दिवशी देशभरातील शाखांमध्ये घोष, व्यायाम, गीत, संघ परेड आणि प्रमुख कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन असे कार्यक्रम आयोजित केले जातात.

संघ शताब्दी वर्षात शक्ती, संस्कार आणि सेवा हा मुख्य संदेश देण्यात येत आहे. देशभरात शाखा विस्तार, सेवा प्रकल्प, पर्यावरण संवर्धन, कुटुंब प्रबोधन, आणि ग्रामविकास यांसारख्या अनेक उपक्रमांना सुरुवात झाली आहे. जालना जिल्ह्यातही वर्षभर विविध सामाजिक उपक्रम, कुटुंब मिलन कार्यक्रम आणि स्वयंसेवक प्रशिक्षण शिबिरे घेण्यात येणार आहेत.

संघशाखेची पारंपरिक परेड आणि ध्वजवंदन, गणवेशातील स्वयंसेवकांचा शिस्तबद्ध संचलन कार्यक्रम, प्रमुख पाहुणे आणि प्रमुख वक्त्यांचे प्रेरणादायी भाषण, शताब्दी वर्षाच्या विशेष उपक्रमांचे उद्घाटन व नियोजन सादरीकरण

संघाच्या स्थानिक शाखेच्या वतीने नागरिकांना या उत्सवाला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आयोजकांनी सांगितले की, हा उत्सव केवळ संघाचा नाही, तर राष्ट्रभावनेचा उत्सव आहे. सर्व समाजघटकांनी यात सहभागी होऊन संघाच्या शताब्दी वर्षाचा आरंभ प्रेरणादायी वातावरणात करावा.

संघाच्या या शताब्दी वर्षात आयोजित विजयादशमी उत्सवामुळे जालना जिल्ह्यातील स्वयंसेवकांमध्ये नवा जोश निर्माण झाला आहे. राष्ट्रभक्ती, संघटनशक्ती आणि संस्कार या तिन्हींचा संगम घडवणारा हा उत्सव, राष्ट्रसेवेच्या नवीन शतकाची सुरुवात ठरू शकतो.

# देवेंद्र भुजबळ यांना माध्यमभूषण पुरस्कार जाहीर

**मुंबई -** कोकणातील दि म्हसळा टाइम्स या वृत्तपत्राच्या १४ व्या वर्धापन दिनानिमित्त रुक्मिणी पांडुरंग पोटले चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई,आणि आदर्श शैक्षणिक समूह संचलित, डी.डी. विसपुते अध्यापक विद्यालय व आदर्श टीचर्स ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, पनवेल, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित, गौरव महाराष्ट्राचा: राज्यस्तरीय माध्यमभूषण पुरस्कार श्री देवेंद्र भुजबळ यांना जाहीर झाला आहे. हा पुरस्कार समारंभ विविध मान्यवरांच्या उपस्थितीत श्री. दादासाहेब धनराजजी विसपुते सभागृह ,आदर्श शैक्षणिक संकुल, देवद-विचुंबे, नवीन पनवेल- ४१०२०६ येथे शनिवार दि.११ ऑक्टोबर २०२५ दुपारी १.00 वाजता होणार आहे.

**अल्प परिचय**

श्री देवेंद्र भुजबळ यांनी आर्थिकदृष्ट्या आकर्षक असलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्या सोडून विचारपूर्वक माध्यम



क्षेत्र निवडले. पत्रकार, दूरदर्शन निर्माता, माहिती खात्यात अधिकारी आणि गेली ५ वर्षे न्यूज स्टोरी टुडे पोर्टल चे (www. newsstorytoday.com) संपादक असे मिळून गेली ४० वर्षे ते प्रसार माध्यम ात सक्रिय आहेत.

देवेंद्र भुजबळ यांना प्रसार माध्यमातील उल्लेखनीय कार्याबद्दल अनेक पुरस्कार, मान सन्मान प्राप्त झाले आहेत. ४ महिन्यांपूर्वीच त्यांना व्यावसायिक नैपुण्याबद्दल रोटरी इंटरनॅशनल संस्थेचा पुरस्कार मिळाला आहे. आता पर्यंत त्यांची भावलेली व्यक्तिमत्वे, गगनभरारी, स्वातंत्र्यवीर सावरकरांची जाज्वल्य पत्रकारिता, प्रेरणेचे प्रवासी, अभिमानाची लेणी ( ई पुस्तक ) करिअरच्या नव्या दिशा,( दुसरी आवृत्ती प्रकाशित) सम ाजभूषण, आम्ही अधिकारी झालो,
( दुसरी आवृत्ती प्रकाशित) माध्यमभूषण ही पुस्तके प्रकाशित झाली असून
संवाद भूषण हे पुस्तक प्रकाशनाच्या वाटेवर आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.